NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ०७.११.२०२६ शनिवार

उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार यांचा मा. अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग यांचे हस्ते गौरव :–

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय, दक्षिण प्रभाग अंतर्गत येणारे पोलीस ठाणे कळमना येथे दाखल असलेल्या गुन्हयातील आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणून गुन्हयातील मुद्येमाल हस्तगत करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा आज दिनांक ०७.११.२०२६ रोजी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर यांनी त्यांचे कार्यालयात प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

पोलीस ठाणे कळमना येथे दाखल जबरी संभोगाचे गुन्हयाचा तत्परतेने योग्य व तांत्रीक तपास करून, आरोपीस निष्पन्न केले. तसेच, आरोपी हा जबलपुर येथे पळुन जात असतांना, त्यास मोठ्या शिताफीने सापळा रचुन जबलपुर हायवे येथुन अटक केली. आरोपीस अवघ्या एका तासात अटक करणारे सपोनि. अजय जाधव, पोहवा. रविकुमार शाहु, प्रदीप पवार, पोअं. संतोष पांडे, मंगेश लोही व प्रफुल्ल गोहोकार यांचा मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर यांनी स्वहस्ते प्रशस्तीपत्रक देवुन त्यांचा सत्कार केला व असेच भविष्यात अधिक उत्कृष्ट काम करण्यासाठी त्यांना प्रोत्साहीत केले.



(कामगिरी)

एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :– हद्दपार ईसमास अटक.

दिनांक ०७.११.२०२६ चे १३.४० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथक हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना पोलीस ठाणे हद्दीत रानी तलाव, इसासनी रोड येथे निळ्या–काळ्या रंगाचा फुलशर्ट व निळा जिन्सपॅन्ट घातलेला एक इसम त्याचे हातात लाकडी दांडा घेऊन येणारे–जाणारे लोकांना शिवीगाळी करुन

धुमाकूळ घालतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे हातातील लाकडी दांडा काढुन, घेतला. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव पवन उर्फ किस्सी तुळशीराम कोरडे, वय २४ वर्षे, रा. इंदीरा माता नगर, मोठ्या विहीरीजवळ, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथुन आणुन त्याचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०९/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने व धुमाकूळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीचे ताब्यातुन वर नमुद लाकडी दांडा जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. गोकुळ महाजन यांचे मार्गदर्शनाखाली, पोहवा. राजेश वरठी, विजय जाणे व पोअं. सचिन सोनवणे यांनी केली.

(गुन्हे)

<u>पोलीस ठाणे हुडकेश्वर :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>

दिनांक ०७.११.२०२६ चे ००.५५ वा. चे सुमारास, हुडकेश्वर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, बेसा, सिताबाई घाटजवळ एक गुलाबी रंगाचा टिशर्ट व राखाडी रंगाचा पॅन्ट घातलेला इसम धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम धुमाकूळ घालतांना दिसुन आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अक्षय सुखसागर शाहु, वय २१ वर्षे, रा. प्लॉट क्र. ५४, खानखोजे नगर, सिध्देश्वर हॉल जवळ, मानेवाडा, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे जिन्स पॅन्टचे आत कंबरेत लपविलेला एक लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन धुमाकूळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.